<u>सं. फौ. ख. क्र.३३७/२०२१</u> निशाणी २२

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – अनिल मनोहर येन्नेवार

वय – ५५ वर्षे, व्यवसाय – सहा पोलीस उपनिरीक्षक पो.स्टे., बार्शिटाकळी

पत्ता – रा. डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी दि.०२.०३.२०२१ रोजी उरळ पो.स्टे. येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. अप क्र.६७/२०२१, मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ चा तपास माझ्याकडे वरीष्ठांच्या आदेशाने वर्ग करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा प्राथमिक तपास विशेष पथकातील पोलीस अशोकसिंग ठाकुर यांनी केला होता. सदर गुन्ह्यातील कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपी यांच्या विरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्या विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिले नव्हते.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. एच. शेगोकार यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, सदर तपासकामी मला कोणतेही आदेश प्राप्त झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०९.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.09 15:37:15 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०९/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०९/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०९/०१/२०२६ |